## इचलकरंजी महानगरपालिका

प्रस्ताव : इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील रि.स.न. १७३५९/ड फायनल प्लॉट नं. ५३६ येथील गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालय चे पहिला मजला बांधकाम करणे व फर्निचर काम करणे कामाचे अंदाजपत्रकीय र.रु. २,०४,९९,१६०/- यास मंजुरी मिळणेबाबत.

संदर्भ — महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.मनपा.२०२३/प्र.क्र.८७-ब-१५०(१)/नवि — १६ दि. २९/०३/२०२३

प्रस्ताव :

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.मनपा.२०२३/ प्र.क्र.८७-ब-१५०(१)/ नवि — १६ दि. २९/०३/२०२३ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद योजनेतंर्गत् गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालय, इचलकरंजी येथील इमारतीवर पहिला मजला अभ्यास केंद्रासाठी इमारत बांधणे या कामांकरीता रक्कम रु. २,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी मात्र) इतका निधी वितरीत करणेस मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच सदर शासन निर्णयान्वये कार्यान्व्यण यंत्रणा महानगरपालिका नेमणेत आलेली आहे.

यास अनुसुरुन इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील रि.स.न. १७३५९/ड फायनल प्लॉट नं. ५३६ येथील गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालय चे पहिला मजला बांधकाम करणे व फर्निचर काम करणे र.रु. २,०४,९९,१६०/- चे अंदाजपत्रक सदर कामाचे प्रकल्प् सल्लगार स्कायटेक कन्सल्टंट प्रा.लि. यांचेकडुन तयार करुन घेणेत आलेले असुन सदर कामास नगररचनाकार, इचलकरंजी महानगरपालिका यांनी त्यांचे जा.क्र./इमपा/नरवि/२४२२/प्र.क्र.०३०/ वशि३८ /१३ दि. २५/१०/२०२३ अन्वये ना-हरकत दिलेली आहे.

तरी महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद योजनेतंर्गत इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील रि.स.न. १७३५९/ड फायनल प्लॉट नं. ५३६ येथील गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालय चे पहिला मजला बांधकाम करणे व फर्निचर काम करणे अंदाजपत्रकीय र.रु. २,०४,९९,१६०/- यास प्रशासकीय ठरावाव्दारे मंजुरी मिळणेस व अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुर घेवुन प्रशासकीय मान्यतेसाठी मा. जिल्हाधिकारी, कोल्हापुर यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस मंजुरी मिळणेस्त्व सदर प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ४५ / २०२३** **दि. १०/११/२०२३**

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येवुन इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद अनुदान अंतर्गत इ.म.पा. हद्दीतील रि.स.न. १७३५९/ड फायनल प्लॉट नं. ५३६ येथील गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालयाचा पहिला मजला बांधकाम करणे व फर्निचर काम करणे कामाचे रक्कम रुपये. २,०४,९९,१६०/- इतक्या अंदाजपत्रकास मान्यता देणेत येत असुन सदर कामी आवश्यक ती तांत्रिक मान्यता घेणेत येवुन सदर प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, कोल्हापुर यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणेत यावा.

तसेच या विकासकामाच्या अंमलबजावणीसाठी पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्तसो यांना प्रदान करण्यात येत आहेत.

10/11/2023

( ओमप्रकाश दिवटे )

**आयुक्त तथा प्रशासक**

**इचलकरंजी महानगरपालिका**

# इचलकरंजी महानगरपालिका

प्रस्ताव : इचलकरंजी म.न.पा.च्या राजर्षी छत्रपती शाहू हायस्कुलकडे इयत्ता ८ वी करीता सेमी इंग्रजी माध्यमांचा वर्ग करणेस मान्यता मिळणेबाबत.

प्रस्ताव :

इचलकरंजी म.न.पा.च्या राजर्षी छत्रपती शाहू हायस्कूल कडे २०२३-२०२४ शैक्षणिक वर्षामध्ये इयत्ता ६ ते १० अशा एकुण ९ वर्गाचे एकुण पटसंख्या ४०७ इतकी असुन इयत्ता ८ वी चे दोन वर्ग सर्व असुन तुकडी अ मध्ये ५२ आणि तुकडी ब मध्ये ३६ अशी पटसंख्या आहे.

हायस्कूलमध्ये इयत्ता ८ वी करीता सेमी इंग्रजी माध्यमाचा एक वर्ग सुरु करणेबाबत पालकांचे कडून सुचना प्राप्त झालेने आणि अशा वर्गात प्रवेश मिळणेबाबत बहुतांशी विद्यार्थ्यांकडुन सेमी वर्ग सुरु व्हावे यासाठी अर्ज प्राप्त झाले असल्याने शाळा व्यवस्थापन समितीकडे दि. १४/०६/२०२३ च्या बैठकीमध्ये सन २०२३-२०२४ पासुन शासन नियमानुसार इयत्ता ८ वर्गात सेमी इंग्रजी मंजुर देणे बाबतचा ठराव क्र. ४ सादर केला आहे.

उपरोक्त शालेय व्यवस्थापन समितीचे ठराव क्र. ४ दि. १४/०६/२०२३ इकडे प्राप्त मान्यतेस अनुसरुन तसेच हायस्कुलकडील बीएससी.बीएड अशी शैक्षणिक आर्हता धारण करणारे सहा. शिक्षक श्री. कुंभार एस.बी.सौ. जाधव यु.पी. सौ. कुंभार एम.ए. श्री. पाटील पी.एल. यांनी कोणतेही जादा वेतन भत्ता इतर मानधन न घेण्याच्या अटीवर शाळेचे दैनंदिन कामकाज सांभाळुन इयत्ता ८ सेमी इंग्रजी तुकडीस अध्यापन करण्याच्या हमीपत्र दिले असल्याने विहीत नमुन्यातील प्रस्ताव मान्यतेसाठी शिक्षण विभागाकडे सादर केला होता.

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने शिक्षण विस्तार अधिकार (प्राथ). जि.प. कोल्हापुर यांनी दि. ०६/१०/२०२३ चे पत्रान्वये मा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, कोल्हापुर यांचेकडे इयत्ता ८ वी च्या तुकडी शैक्षणिक वर्ष २०२३/२४ पासुन गणित विज्ञान विषय गणित इंग्रजी माध्यमातील शिकवण्यास परवानगी देण्यासाठी शिफारस केली आहे.

या अनुषंगाने मा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प. कोल्हापुर यांनी सदर प्रस्ताव पुढील कार्यवाहीस्त्व मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापुर विभाग कोल्हापुर यांच्याकडे दि. ०२/११/२०२३ पत्रान्वये सादर केला आहे.

आता मा. शिक्षण उपसंचालक जि.प.कोल्हापुर यांचेकडून उपरोक्त प्रस्तावांचे कामी चेकलिस्ट प्राप्त झाली असुन त्यानुसार प्रस्तावांमध्ये हायस्कुलकडील इ. ८ वी चा वर्ग सेमी करणे आवश्यक आहे. त्यासाठी संस्थेच्या ठरावाची आवश्यकता आहे.

तरी वरील प्रमाणे वस्तु स्थिती अवलोकन येवुन विषयांकित प्रकरणी वरील प्रमाणे कार्यवाहीस मा. प्रशासकीय मान्यता मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

दि. ०१ /११/२०२३

**प्रशासकीय ठराव क्र. ४६ / २०२३**

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येवुन इचलकरंजी महानगरपालिकेच्या राजर्षी छत्रपती शाहु हायस्कुलकडे इयत्ता ८ वी करीता सेमी इंग्रजी माध्यमांचा वर्ग सुरु करणेस मंजुरी देणेत येत आहे.

०१।११।२०२३

( ओमप्रकाश दिवटे )

**आयुक्त तथा प्रशासक**

**इचलकरंजी महानगरपालिका**

## इचलकरंजी महानगरपालिका

प्रस्ताव : सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२०२४ अग्निशमन सेवांचे बळकटीकरण योजना (जिल्हास्तर) अंतर्गत अग्निशमन उपकरणे खरेदी कामांना मंजुरी देणेबाबत.

संदर्भ : मे. जिल्हा सह आयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांचेकडील क्र. कार्या. ११/नपा/आरआर/संक.७/२९४/२०२३ दि. २५/१०/२०२३ चे पत्र

प्रस्ताव :

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२०२४ अग्निशमन सेवांचे बळकटीकरण योजना (जिल्हास्तर) करीता ३० लक्ष इतका निधी मे. जिल्हा सह आयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापुर यांचेकडील संदर्भीय पत्रान्वये निश्चित करण्यात आलेला असुन मंजुर अनुदानातुन संबंधित योजनेच्या विहीत निकषानुसार परिपुर्ण प्रस्ताव सादर करणेस सुचित करणेत आलेले आहे. यानुसार अग्निशमन विभागासाठी खालीलप्रमाणे शोध व बचाव सामुग्री खरेदी करणे आवश्यक आहे.

शोध व बचाव कार्य साहित्य यादी

| SR NO | EQUIPMENT NAME | PRICE ON GEM | QUANTITY | TOTAL PRICE |
|---|---|---|---|---|
| १ | HDPE BOAT FOR RESCUE | १३,५०,०००/- | १ | १३,५०,०००/- |
| २ | HDPE REMOTE CONTROLLED LIFEBUOY | ८,००,०००/- | १ | ८,००,०००/- |
| ३ | STHIL CARBIDE TIPPED BLADE CHAIN SAW | ५५,९००/- | २ | १,११,८००/- |
| ४ | HAND HELD NOZZLE | ३१,०००/- | २ | ६२,०००/- |
| ५ | HDPE PANTOON BOATS/ FLOATING JELLY | २४,०००/- | १० | २,४०,०००/- |
| ६ | LIFE JACKET | १३,३५०/- | ५ | ६६,७५०/- |
| ७ | FOAM EDUCTOR NOZZLE | १२,७००/- | २ | २५,४००/- |
| ८ | SPINE BOARD WITH STRAPS | १२,०००/- | २ | २४,०००/- |
| ९ | RESPIRATORY FILTER FULL FACE MASK | ११,०००/- | ४ | ४४,०००/- |
| १० | AND HELD SEARCH LIGHT | १०,७००/- | ४ | ४२,८००/- |
| ११ | FIRE HOSES WITH DELIVERY COUPLING | ९,५००/- | ५ | ४७,५००/- |
| १२ | SURVIVAL FIRE BLANKET | ९,०००/- | २ | १८,०००/- |
| १३ | ABC TYPE FIRE EXTINGUISHER | ८४००/- | १० | ८४०००/- |
| १४ | CO२ TYPE FIRE EXTINGUISHER | ७,२५०/- | १० | ७२,५००/- |
| १५ | MEGAPHONE | ५,०००/- | २ | १०,०००/- |
| १६ | FIREMAN GLOVES | ४,३००/- | १० | ४३,०००/- |
| १७ | LIFEBUOY | ३४८०/- | १० | ३४,८००/- |
| १८ | SAFETY HELMET WITH TORCH | २६००/- | १५ | ३९,०००/- |
| | | | TOTAL PRICE | ३१,१५,५५०/- |

वरील नमुद शोध व बचाव साधन सामुग्री च्या अंदाजपत्रकाना व सदर कामांचा प्रस्ताव सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२०२४ अग्निशमन सेवांचे बळकटीकरण योजना (जिल्हास्तर) या योजनेअंतर्गत मा. जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणेस इकडील र.रु. ३१,१५,५५०/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेस व सदर प्रस्तावास तांत्रिक मान्यता मिळणेकामी सदर प्रस्ताव मा. मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग, कोल्हापुर महानगरपालिका यांचेकडे पाठविणेकामी मान्यता मिळणेस इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

P.T.O

**प्रशासकीय ठराव क्र. ४७ / २०२३** दि. ०७/१२/२०२३

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येवुन सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२०२४ अग्निशमन सेवांचे बळकटीकरण योजना (जिल्हास्तर) या योजनेअंतर्गत प्रस्तावात नमुद केले अ.क्र. १ ते १८ (यादी) शोध व बचाव साधन सामुग्रीच्या एकुण रक्कम रु. ३१,१५,५५०/- इतक्या अंदाजपत्रकास मंजुरी देणेत येत असुन सदर प्रस्ताव मा. मुख्य् अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग, कोल्हापुर महानगरपालिका यांचेकडे तांत्रिक मान्यता मिळणेकामी सादर करणेत यावा. तदनंतर सदर प्रस्ताव मा. जिल्हाधिकारीसो, कोल्हापुर यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

०७/१२/२०२३

( ओमप्रकाश दिवटे )

**आयुक्त तथा प्रशासक**

**इचलकरंजी महानगरपालिका**

**इचलकरंजी महानगरपालिका**

**प्रशासकीय ठराव क्र. ४८** दि. ०७ /१२/२०२३

प्रस्ताव : विकास योजना इचलकरंजी (मंजुर)
आरक्षण क्र. ३५ गार्डन. इचलकरंजी रि.स.न. ६४७/२ पैकी. सि.स.न. १७५६० पैकी मधील अर्जदार यांचे मालकीच्या १६ आर क्षेत्राचे भुसंपादन होणेकरीता मान्यता मिळणेबावत.

संदर्भ –
१) श्री. प्रकाश दत्तात्रय जगताप व इतर १० यांचेतर्फे अँड श्री. राम व्ही मुदगल यांची दि. ०३/०७/२०२३ रोजीची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वयेची नोटीस
२) या कार्यालयाकडील जा.क्र./इमपा/नरवि/२०२३/७४३/२३ दि. ०१/०८/२०२३ रोजीचे पत्र
३) या कार्यालयाकडील जा.क्र./इमपा/नरवि/२०२३/प्र.क्र. ०१४/८६४/२३ दि. २३/०८/२०२३ रोजीचे स्मरणपत्र
४) अँड. श्री. राम. व्ही. मुदगल यांचे दि. ०७/०८/२०२३ व दि. २५/०८/२०२३ रोजीचे पत्र

प्रस्ताव :

इचलकरंजी शहराची मंजुर विकास योजना शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसुचना क्र. टिपीएस/२१९४/२७०/सी.आर -२२/९४/ युडी-१३/ दि. ०५/०३/१९९९ रोजी मंजुर झाली असुन अधिसुचना क्र. टीपीएस/२१००/१४२९/सी.आर-१३३/२०००/युडी-१३ दि. ०३/०९/२००१ अन्वये वगळलेल्या भागाची विकास योजना मंजुर झालेली आहे. उक्त विकास योजनेनुसार आरक्षण क्र. ३५ गार्डन या आरक्षणाने बाधीत होणा-या इचलकरंजी रि.स.न. ६४७/२ पैकी सि.स.न. १७५६० पैकी मधील १) श्री. प्रकाश दत्तात्रय जगताप. २) श्रीमती मंगल पांडुरंग जगताप ३) सौ. लता बजरंग पाचुंदे ४) सौ. निता रमेश चव्हाण ५) श्री. संजय पांडुरंग जगताप ६) श्री. संतोष वसंत जगताप ७) नितीन वसंत जगताप ८) विजय वसंत जगताप ९) सौ. अनिता संदिप मगदुम १०) श्री. दिपक वसंत जगताप ११) श्री. सतिश राजाराम जगताप यांच्या मालकीच्या जागेचे संपादन होणेकरीता अँड श्री. राम व्ही. मुदगल यांनी दि. ०३/०७/२०२३ रोजीची खरेदी सुचना समुचित प्राधिकरणास म्हणजेच इचलकरंजी महानगरपालिकेस बजावलेली आहे.

विकास योजना अहवालानुसार आरक्षण क्र. ३५ गार्डन हे आरक्षण इचलकरंजी रि.स.न. ६४७/२ पैकी. सि.स.न. १७५६० पैकी मध्ये समाविष्ठ होते. आरक्षणाचे एकुणअंदाजे क्षेत्र -४८ आर इतके आहे. मात्र क्र. टिपीएस २११३/२७२/प्र.क्र.४८७/१३/ नवि-१३ दि. ०२ मार्च २०१५ अन्वये सदर आरक्षणामधुन ९ आर इतके क्षेत्र वगळलेले आहे. सबब उक्त आरक्षणाचे एकुण अंदाजित शिल्लक क्षेत्र -३९ आर इतके आहे. त्यापैकी उक्त अर्जदार यांनी त्यांच्या मालकीचे अंदाजित १६ आर क्षेत्र संपादीत होणेकरीता खरेदी सुचना बजावलेली आहे.

त्या अनुषंगाने संदर्भिय क्र. २ व ३ चे पत्रान्वये अँड मुदगल यांना उक्त आरक्षणाखालील जागा संपादीत करावयाची असल्यास सदरची जागा महानगरपालिकेकडे TDR (Transferable Devolpment Rights) हस्तांतरणीय विकास हक्क पध्दतीने अथवा समावेशक आरक्षणाच्या (Accomodation Reservation) माध्यमातुन ताब्यात देणेस अशिल तयार असल्यास या कार्यालयास लेखी संमत्तीव्दारे अवगत करणेबाबत कळविले होते. मात्र संदर्भिय क्र. ४ चे पत्रान्वये अँड मुदगल यांनी त्यांचे अशिल TDR हस्तांतरणीय विकास हक्क पध्दतीने अथवा समावेशक आरक्षणाच्या माध्यमातुन ताब्यात देणेस तयार / इच्छुक नसलेबाबत कळविले आहे.

सबब आरक्षण क्र. ३५ गार्डनचे अंदाजे १६ आर या क्षेत्राकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार नविन भुसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदीनुसार भुसंपादन करणेकरीता व येणा-या खर्चास मंजुरी मिळणेस्तव इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

पुढील पानावर....

ाक ०१ एप्रिल २०२२ ते ३१

कर्मचाऱ्यांना

दि. ०७/१२/२०२३

**प्रशासकीय ठराव क्र. ४८ / २०२३**

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येवुन उक्त विकास योजनेनुसार आरक्षण क्र. ३५ गार्डन. इचलकरंजी रि.स.न. ६४७/२ पैकी सि.स.न. १७५६० पैकी मधील प्रस्तावात नमुद कल्ले १ ते ११ (नावे) मालकीच्या अंदाजे क्षेत्र – १६ आर या क्षेत्राचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ अन्वये नविन भुसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदीन्वये भुसंपादन करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मंजुरी देणेत येत आहे.

तसेच या विकासकामाच्या अंमलबजावणीसाठी पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्तसो यांना प्रदान करण्यात येत आहेत.

07/12/2023

( ओमप्रकाश दिवटे )

**आयुक्त तथा प्रशासक**

**इचलकरंजी महानगरपालिका**

## इचलकरंजी महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव क्र. ४९** दि. ०८ /१२/२०२३

**प्रस्ताव :** UIDSSMT अंतर्गत इचलकरंजी शहर भुयारी गटर योजना उर्वरीत काम

**संदर्भ:-**

१. जा.क्र.पापू-१६९९/२०२१, दि.२४/१२/२०२१ नुसार मे. स्कायटेक कन्सल्टंट प्रा.लि.कोल्हापुर यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन देणेत आलेले नेमणुकीचे आदेश.

२. जा.क्र./पा.पु/५८६/२०२२२, दि. ०२/०६/२०२२ नुसार विषयांकितकामी मक्तेदार - मे. अंकिता कन्स्ट्रक्शन, गुजरात यांना देण्यात आलेला कार्यारंभ आदेश.

३. विषयांकीतकामीचे दि.०८ /११/२०२३ अखेर अदा करणेत आलेली एकुण ०८ वे धावते देयके

४. जा.क्र. /इचल-ड्रेनेज/४१२/२०२३, दि. ०३/११/२०२३ रोजीचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. स्कायटेक कन्सल्टंट प्रा.लि., कोल्हापुर यांचे पत्र.

**प्रस्ताव :**

विषयांकितकामी UIDSSMT अंतर्गत इचलकरंजी शहर भुयारी गटर योजना - उर्वरीत काम याकरीता संदर्भ क्र. ०१ चे आदेशान्वये स्कायटेक कन्सल्टंट प्रा.लि. कोल्हापूर, यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून इकडील कार्यालयामार्फत नेमणूक करण्यात आली आहे. सदर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी नमुद योजनेमधील यापूर्वीचे मक्तेदार यांनी केले कामाव्यतिरीक्त उर्वरीत कामाकरीता अंदाजपत्रकीय उपांगनिहाय उर्वरीत परिमाणे निश्चित करून र.रू. ४५,४०,४२,९५८/- इतक्या रकमेचे अंदाजपत्रक इकडे सादर केले व त्या अंदाजपत्रकास अनुसरून इकडील विभागामार्फत निविदा प्रक्रीया राबविण्यात आली आहे. सदर निविदा प्रकीयेअंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा शे.११.३५% जादा दराने मे.अंकीता कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुर करण्यात आली असुन संदर्भ क्र. ०२ चे आदेशान्वये याकामी मक्तेदार यांना कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.

मक्तेदार यांनी निविदेतील अटी व शर्ती नुसार आवश्यक त्या सर्व मंजुरी घेऊन याकामीचे १८ द.ल.लि. क्षमतेचे STP बांधणे कामास सुरूवात केली असुन या कामास अनुसरून आजअखेर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.स्कायटेक कन्सल्टंट यांनी नोंद घेतले प्रमाणे एकूण ०८ धावती देयक इकडील विभागामार्फत अदा करण्यात आले आहे. आठव्या धावत्या देयका अखेर र.रू. १३,९९,९९,४५६/- इतक्या रकमेचे देयक मक्तेदार यांना अदा केले आहे.

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. स्कायटेक कन्सल्टंट प्रा.लि.यांना खालील नमुद केले प्रमाणे देयक अदा करणेबाबत निश्चित करणेत आले आहे –

| अ.क्र. | तपशील (कामाचे टप्पे) | अदा करावयाचे देयक |
|---|---|---|
| १ | After Submitting tender documents to IMC | ०.२५% of Total Project cost stated above |
| २ | On issuing work order to Agency | ०.५०% of Total Project cost stated above |
| ३ | Along with Concentrator's R.A.Bill | १.१०% of Total Project cost stated above |
| ४ | After १००% Completion of the Project | ०.१४% of Total Project cost stated above |

वरील पैकी अ.क्र.१ व २ चे एकुण प्रकल्प रक्कमेच्या ०.७५% देयक र.रु.३७,९१,८२६/- स्कायटेक कन्सल्टंट यांना अदा करणेत आले असुन अ.क्र. ३ व ४ करिताचे एकुण १.२४% प्रमाणे पहिल्या चार धावत्या देयकापोटीची र.रु.८,०४,०२७/- असे एकुण ४५,९५,८५४/- रक्कम अदा करणेत आलेली आहे. दरम्यान प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी संदर्भ क्रं. ०४ चे पत्रान्वये त्याचे वैयक्तिक जीवनातील

कारणास्तव यापुढे विषयांकीत कामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन काम पाहणार नसल्याचे नमुद केले आहे.

सदर उर्वरीत कामातील मलशुध्दीकरण केंद्राचे जवळपास ४०% काम शिल्लक असुन याकामी भुयारी गटारीचे जाळे टाकणेचे काम सध्या सुरु आहे. भुयारी गटारीच्या जाळ्यामधील शहापुर ते टाकवडे वेस मलशुध्दीकरण केंद्रापर्यंतची ट्रंक मेन (साधारणतः ५ कि.मी.) टाकणेचे काम सुरु असुन उर्वरीत कामामध्ये मुळ योजनेमधील एकुण ९१ कि.मी. पाईप लाईन पैकी ३० कि.मी. पाईप लाईन टाकणे समाविष्ट आहे. सदर मुळ योजनेचे काम पुर्णत्वास येणे कामी आवश्यक असणारा उपांग निहाय अतिरिक्त निधी आवश्यक असल्याने याकामी Excess-Saving Statement तयार करणे आवश्यक आहे व त्या प्रमाणे आवश्यक असणारा अतिरिक्त निधी हा नगरविकास विभागाच्या दि.१४/०९/२०२० रोजीचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-३४१६/प्र.क्र.४०/नवि-०४ नुसार सदर योजनेच्या व्याजाच्या रक्कमेतुन उभारणेकामी प्रस्ताव तयार करुन सदर प्रस्तावास नगरविकास विभागामार्फ़त प्रशासकीय मंजुरी घेणे आवश्यक आहे.

विषयांकीतकामी दैनंदिन देखरेख करणे, मोजमापे निश्चित करणे, भुयारी गटारीचे जाळे टाकणे, वरील नमुद केले प्रमाणे प्रस्ताव तयार करणे व सदर प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी घेणे इत्यादी कामे कालबध्दरीत्या करणे आवश्यक असल्याने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार कार्यरत असणे आवश्यक आहे.

सद्या अमृत २.० अंतर्गत इचलकरंजी शहरातील अस्तित्वातील भुयारी गटर योजनेचे बळकटीकरण करणे, शहराच्या वाढीव भागामध्ये भुयारी गटाराचे जाळे तयार करणेचा प्रस्ताव इकडील विभागामार्फ़त तयार करणेत आलेला आहे. सदरचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी इकडील कार्यालयामार्फ़त मे. यश इंजिनिअरिंग कन्सटंन्ट प्रा.लि.,नवि - मुंबई, यांची प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणुन नेमणुक करणेत आलेली आहे. सदर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी इचलकरंजी शहराचे वाढत जाणारी लोकसंख्या, शहरामध्ये कालानुरुप होणारी औद्योगीक प्रगती, शहरामध्ये वाढत्या तरंगत्या लोकसंख्येचे प्रमाण, अस्तित्वातील भुयारी गटर योजनेची कालानुरुप कमी झालेली कार्यक्षमता, अस्तित्वातील भुयारी गटारांच्या जाळ्यामध्ये वारंवार होणारे लिकिजेस व चोकअप, UIDSSMT अंतर्गत सद्या सुरु असलेली भुयारी गटर योजना, इचलकरंजी शहराला भेडसवणारा पंचगंगा नदी प्रदुषण प्रश्न, सांडपाण्यावर प्रक्रिया करणेकामी शासना मार्फ़त वेळोवेळी सुधारित करणेत आलेली नियमावली या सर्व बाबींचा विचार करुन अस्तित्वातील भुयारी गटारीचे बळकटीकरण करणे, शहराच्या वाढीव भागामध्ये भुयारी गटारीचे जाळे विकसित करणे याकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केलेला आहे. सदर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करताना पुर्ण शहराचा टोपो ग्राफ़िकल सर्व्हे केला असुन प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना UIDSSMT अंतर्गत टाकणेत आलेल्या पाईप लाईनचे पुर्ण ज्ञान आहे. सदर उर्वरित काम हे जुन २०२४ अखेर पुर्ण करणे अत्यावश्यक असल्याने याकामी नव्याने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणुक करणे, नविन नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी झालेल्या कामाची माहीती घेणे यामध्ये बराच कालावधी लागणार असल्याने सद्या सुरु असलेल्या उर्वरित कामीच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे. यश इंजिनिअरिंग कन्सटंन्ट प्रा.लि.,नवि - मुंबई यांची नेमणुक झालेस सोईचे होणार आहे.

तरी UIDSSMT अंतर्गत इचलकरंजी शहर भुयारी गटर योजना - उर्वरित काम याकामी नव्याने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणेकरिता सद्या सुरु असलेल्या कामाची सद्य स्थिती व उर्वरीत काम, मक्तेदार यांना सदरचे काम पुर्ण करणेसाठी असणारा उर्वरीत अवधी, पंचगंगा नदी प्रदुषणाच्या अनुशंगाने याकामाचा असणारा प्राधान्यक्रम, मा.हरित लवाद येथे दाखल अर्ज क्र.५६३/२०२२ – ब्रिंदा बासु विरुध्द महाराष्ट्र शासन इकडील विभागा मार्फ़त पंचगंगा नदी प्रदुषण कमी करणेकामी सादर करणेत आलेला मुदत बंद कृती आराखडा, मे. यश इंजिनिअरिंग कन्सटंन्ट प्रा.लि.,नवि – मुंबई यांची महानगरपालिकेच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नामिकेमध्ये असणारी नेमणुक, मे. यश इंजिनिअरिंग कन्सटंन्ट प्रा.लि.,नवि – मुंबई यांना UIDSSMT चे मुळ योजनेचे असलेला अनुभव या सर्व बाबींचा विचार करुन विषयांकीत कामी प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणुन मे.स्कायटेक कन्सल्टंट प्रा.लि., कोल्हापुर यांची नेमणूक रद्दबादल करुन मे. यश इंजिनिअरिंग कन्सटंन्ट

प्रा.लि..नवि - मुंबई यांची मे.स्कायटेक कन्सल्टंट प्रा.लि यांना मंजुर असलेल्या दराप्रमाने उर्वरीत कामी प्रत्येक धावत्या देयका पोटी सदर धावत्या देयकाच्या १.१०% व काम पुर्ण झालेनंतर प्रकल्प रक्कमेच्या ०.१४% या मंजुर दरास ग्राह्य धरुन नियुक्ती होणेस मंजुरी मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

दि. ०८/१२/२०२३

**प्रशासकीय ठराव क्र. ४८ / २०२३**

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येवुन UIDSSMT अंतर्गत इचलकरंजी शहर भुयारी गटर योजनचे प्रकल्प् व्यवस्थापन सल्लगार मे. स्कायटेक कन्सल्टंट प्रा.लि. यांनी दिले संदर्भीय क्र. ४ च्या पत्रान्वये केली विनंतीचे अवलोकन करता त्यांची नेमणुक रद्दबादल करुन सदर कामाची निकड पाहता मे. स्कायटेक कन्सल्टंट यांना मंजुर केले दराप्रमाणेच उर्वरीत कामी प्रत्येक धावत्या देयका पोटी सदर धावत्या देयकाच्या १.१०% व काम पुर्ण झालेनंतर प्रकल्प् रक्केमच्या ०.१४% या मंजुर दरात मे. यश इंजिनिअरींग कन्सल्टंट प्रा.लि. नवि मुंबई यांची उपरोक्त् प्रकल्पाचे उर्वरीत काम पुर्ण करणेस म.न.पा. पॅनेलवर प्रकल्प् व्यवस्थापक सल्लगार म्हणुन नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरकामी पुढील सर्व अनुषंगिक कार्यवाही करणेचे अधिकार मा. आयुक्त् यांना देणेत येत आहेत.

08/12/2023

( ओमप्रकाश दिवटे )

**आयुक्त तथा प्रशासक**

**इचलकरंजी महानगरपालिका**

**इचलकरंजी महानगरपालिका**

**प्रशासकीय ठराव क्र. ५०** **दि. ०८/१२/२०२३**

प्रस्ताव : नविन ११ आरोग्य वर्धिनी केंद्र (HWC) साठी महानगरपालिकेकडील जागा मिळणेबाबत.

संदर्भ –

१) राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, पंचायत समिती, हातकणंगले याचे कार्यालयाकडील जा.क्र./पसहा/वशि/५९/२०२३ दि. ०५/१०/२२३ चे पत्र

२) रा. वैदयकीय आरोग्य अधिकारी इ.म.पा. यांचा दि. ०५/१०/२०२३ चा रिपोर्ट

प्रस्ताव :

सदर प्रकरणी तालुका आरोग्य अधिकारी यांनी ११ आरोग्य वर्धिनी केंद्रासाठी मागणी केलेल्या जागांबाबत रा. नगररचना विभाग व रा. बांधकाम विभाग यांचा अभिप्राय प्राप्त आहे तो खालीलप्रमाणे.

| अ.नं. | ठिकाण | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | लालबहादूर शास्त्री शाळा क्र. ३४ | सदर ठिकाणची स्थळ पाहणी केली असता उक्त विषयांकित कामी दयावयाची जागा ही प्रत्यक्ष सरदार वल्लभभाई पटेल विदया मंदिर क्र. १५ मध्ये आहे. सदरची जागा प्रायमरी स्कूल अँण्ड प्ले ग्राउंड या आरक्षणामध्ये असून UDCPR मधील विनियम क्र. ४.२७.२ नुसार 'पब्लिक युटीलीटी ' या वापरामध्ये 'हेल्थ सर्विसेस 'अनुज्ञेय आहे. |
| २ | भारतमाता विद्या मंदिर क्र. ३३, षटकोनी इमारत | उक्त क्र. १ मधील तरतुदीनुसार 'हेल्थ सर्विसेस 'अनुज्ञेय आहे. |
| ३ | आरगे भवन व्यायाम शाळा | सदर जागा आ.क्र. प्ले ग्राउंड या आरक्षणामध्ये समाविष्ठ असल्यामुळे UDCPR मधील तरतुदी नुसार 'HWC'या वापरासाठी अनुज्ञेय नाही. |
| ४ | हु. भगतसिंग वि.मं. शाळा क्र. २२ षटकोनी इमारत | सद्यस्थितीत सदर ठिकाणी अंगणवाडी भरत असल्याने सदर अंगणवाडीसाठी पर्यायी जागा उपलब्ध असलेबाबत उक्त शाळेच्या मुख्याध्यापकाकडून ना हरकत घेवून अ.क्र. १ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार 'HWC'वापर अनुज्ञेय आहे. |
| ५ | जिम्नॅशिअम हॉल | सदर जागा आ.क्र. १५५ प्ले ग्राउंड या आरक्षणामध्ये समाविष्ठ असल्यामुळे UDCPR मधील तरतुदी नुसार 'HWC' या वापरासाठी अनुज्ञेय नाही. |
| ६ | झाकिर हुसेन उर्दु शाळा | सदरची जागा विद्यमान प्राथमिक शाळा असून विकास योजनेनुसार सार्वजनिक निम सार्वजनिक विभागामध्ये समाविष्ट होते. UDCPR मधील विनियम क्र. ४.१० नुसार 'HWC' हा वापर अनुज्ञेय आहे. |
| ७ | वेणुताई चव्हाण विद्या मंदिर शाळेजवळील हॉल | सदर हॉलचे बांधकाम अपूर्ण अवस्थेत आहे. त्यामुळे सदर हॉल म.न.पा. च्या ताब्यात दिलेला नाही. शासकीय तंत्रनिकेतन महाविदयालयांकडून स्ट्रक्चर ऑडिट करुन घेवून सदर हॉल आरोग्य वर्धिनी केंद्रासाठी अनुज्ञेय होईल. |
| ८ | जवाहरनगर पोष्ट ऑफिस शेजारील हॉल | सदरची जागा मंजूर रेखांकनातील 'ओपन स्पेस' जागा आहे. सदर जागेवर 'HWC' हा वापर करावयाचा असलेस सदर मंजूर रेखांकनातील सर्व भुखंडधारक रहिवाशी यांच्या पूर्व संमत्तीने करणेस हरकत नाही. |
| ९ | जगताप तालीम मंडळ | सदर जागेची स्थळ पाहणी केली असता सदर जागेवरील इमारत जिर्ण झाली असून सदर इमारत वापरण्यायोग्य नाही तथापी याबाबत बांधकाम विभागाचा अभिप्राय घेणेत यावेत असा नगररचना विभागाचा अभिप्राय प्राप्त होता त्यानुसार बांधकाम विभागाने सदर ठिकाणी पाहणी करुन बिल्डींग जिर्ण अवस्थेत असलेचे व रिएनफोर्स मेंट उघडी असलेचा अभिप्राय दिला आहे. |
| १० | शांतीनगर कस्तुरबा वि.मं. चे पाठिमागील म.न.पा. गाळे | सदर ठिकाणी 'HWC' वापर अनुज्ञेय आहे. |

| | | |
|---|---|---|
| ११ | भिडे कल्याण केंद्र | खाजगी जागा |
| १२ | बरगे मळा, जुना चंदूर रोड, रवी लोहार यांचे गाळे | खाजगी जागा. |

सदर अभिप्राय विचारात घेता सदर जागा आरोग्य वर्धिनी केंद्रासाठी देणेकामी एकत्रित अहवाल खालीलप्रमाणे

| अ.नं. | ठिकाण | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | लालबहादूर शास्त्री शाळा क्र. ३४ | सदर जागा आरोग्य वर्धिनी केंद्र वापरासाठी अनुज्ञेय आहे. |
| २ | भारतमाता विद्या मंदिर क्र. ३३, षटकोनी इमारत | सदर जागा आरोग्य वर्धिनी केंद्र वापरासाठी अनुज्ञेय आहे. |
| ३ | आरगे भवन व्यायाम शाळा | सदर जागा 'HWC' या वापरासाठी अनुज्ञेय नाही. |
| ४ | हु. भगतसिंग वि.मं. शाळा क्र. २२ षटकोनी इमारत | सदर जागा उक्त शाळेच्या मुख्याध्यापकाकडून ना हरकत घेवून आरोग्य वर्धिनी केंद्र वापरासाठी अनुज्ञेय आहे. |
| ५ | जिम्नॅशिअम हॉल | सदर जागा 'HWC' या वापरासाठी अनुज्ञेय नाही. |
| ६ | झाकिर हुसेन उर्दु शाळा | सदर जागा आरोग्य वर्धिनी केंद्र वापरासाठी अनुज्ञेय आहे. |
| ७ | वेणुताई चव्हाण विद्या मंदिर शाळेजवळील हॉल | सदर जागा आरोग्य वर्धिनी केंद्र वापरासाठी अनुज्ञेय आहे. तथापी सदर हॉलचे बांधकाम अपूर्ण अवस्थेत आहे. त्यामुळे सदर हॉलचे बांधकाम पूर्ण करुन घेवून शासकीय तंत्रनिकेतन महाविदयालयांकडून स्ट्रक्चरल ऑडिट करुन घेणेचे अटीस अधिन राहून सदर हॉल आरोग्य वर्धिनी केंद्रासाठी अनुज्ञेय होईल. |
| ८ | जवाहरनगर पोष्ट ऑफिस शेजारील हॉल | मंजूर रेखांकनातील सर्व भुखंडधारक रहिवाशी यांच्या पूर्व संमत्ती घेणेचे अटीस अधिन राहून सदर जागा आरोग्य वर्धिनी केंद्र वापरासाठी अनुज्ञेय आहे. |
| ९ | जगताप तालीम मंडळ | सदर इमारती जिर्ण अवस्थेत असलेने आवश्यक दुरुस्ती करुन घेवून शासकीय महाविदयालयामार्फत स्ट्रक्चरल ऑडिट करुन घेणेचे अटीस अधिन राहून सदर हॉल आरोग्य वर्धिनी केंद्रासाठी अनुज्ञेय होईल. |
| १० | शांतीनगर कस्तुरबा वि.मं. चे पलिकडील म.न.पा. गाळे | सदर जागा आरोग्य वर्धिनी केंद्र वापरासाठी अनुज्ञेय आहे. |
| ११ | भिडे कल्याण केंद्र | खाजगी जागा |
| १२ | बरगे मळा, जुना चंदूर रोड, रवी लोहार यांचे गाळे | खाजगी जागा. |

वरील नगररचना विभाग, बांधकाम विभागाचा अभिप्राय विचारात घेता अ.नं. १,२,४,६,१० मध्ये नमूद जागा 'HWC' वापर अनुज्ञेय आहे तसेच अ.नं. ७,८,९ मध्ये नमूद जागेसाठी वरीलप्रमाणे आवश्यक अटीच्या अधिन राहून सदर जागा 'HWC' साठी वापर करता येईल. त्यानुसार वरील नमूद ८ जागांसाठी तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, हातकणंगले यांना 'HWC' जागा दयावयाची झाल्यास प्रशासकीय ठरावाने व महानगरपालिका अटी शर्तीस अधिन राहून देता येईल. तरी त्यास आपली मान्यता मिळावी ही विनंती.

**प्रशासकीय ठराव क्र. ५० / २०२३**

दि. ०८/१२/२०२३

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येवुन नगररचना व बांधकाम विभाग यांचे अभिप्रायाप्रमाणे प्रस्तावात नमुद अ.क्र. १,२,४,६,१० या जागा HWC साठी अनुज्ञेय असुन अ.नं. ७,८,९ मध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहुन खालीलप्रमाणे ८ ठिकाणच्या म.न.पा. जागेत तालुका

आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, हातकणंगले यांना आरोग्य वर्धिनी केंद्र 'HWC' सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.नं. | ठिकाण | अटी/शर्ती |
|---|---|---|
| १ | लालबहादूर शास्त्री शाळा क्र. ३४ | अनुज्ञेय आहे. |
| २ | भारतमाता विद्या मंदिर क्र. ३३, षटकोनी इमारत | अनुज्ञेय आहे. |
| ३ | हु. भगतसिंग वि.मं. शाळा क्र. २२ षटकोनी इमारत | सदर जागा उक्त शाळेच्या मुख्याध्यापकाकडून ना हरकत घेवून आरोग्य वर्धिनी केंद्र वापरासाठी अनुज्ञेय आहे. |
| ४ | झाकिर हुसेन उर्दु शाळा | अनुज्ञेय आहे. |
| ५ | वेणुताई चव्हाण विद्या मंदिर शाळेजवळील हॉल | सदर जागा आरोग्य वर्धिनी केंद्र वापरासाठी अनुज्ञेय आहे. तथापी सदर हॉलचे बांधकाम अपूर्ण अवस्थेत आहे. त्यामुळे सदर हॉलचे बांधकाम पूर्ण करुन घेवून शासकीय तंत्रनिकेतन महाविदयालयांकडून स्ट्रक्चरल ऑडिट करुन घेणेचे अटीस अधिन राहून सदर हॉल आरोग्य वर्धिनी केंद्रासाठी अनुज्ञेय होईल. |
| ६ | जवाहरनगर पोष्ट ऑफिस शेजारील हॉल | मंजूर रेखांकनातील सर्व भुखंडधारक रहिवाशी यांच्या पूर्व संमत्ती घेणेचे अटीस अधिन राहून सदर जागा आरोग्य वर्धिनी केंद्र वापरासाठी अनुज्ञेय आहे. |
| ७ | जगताप तालीम मंडळ | सदर इमारती जिर्ण अवस्थेत असलेने आवश्यक दुरुस्ती करुन घेवून शासकीय महाविदयालयामार्फत स्ट्रक्चरल ऑडिट करुन घेणेचे अटीस अधिन राहून सदर हॉल आरोग्य वर्धिनी केंद्रासाठी अनुज्ञेय होईल. |
| ८ | शांतीनगर कस्तुरबा वि.मं. चे पाठीमागील म.न.पा. शाळे | अनुज्ञेय आहे. |

सदरकामी पुढील सर्व अनुषंगिक कार्यवाही करणेचे अधिकार मा. आयुक्त यांना देणेत येत आहेत.

08/12/2023

( ओमप्रकाश दिवटे )

**आयुक्त तथा प्रशासक**
**इचलकरंजी महानगरपालिका**

इचलकरंजी महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव क्र. ५१** **दि. ०८ /१२/२०२३**

प्रस्ताव : इचलकरंजी शहरातील अस्तित्वातील भुयारी गटार योजनेचे बळकटीकरण करणे. शहराच्या वाढीव भागामध्ये भुयारी गटाराचे जाळे तयार करणे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत प्रस्ताव सादर करणे व त्यास निधी उपलब्ध होणे बाबत.

संदर्भ :-

१) क्रमांक-बैठक-२०२३/प्र.क्र.२६२/नवि-१६दि.०७.०७.२०२३ नुसार चे मा.मुख्यमंत्री यांच्या दि.१७.०४.२०२३ च्या बैठकीचे इतिवृत्त.

२) जा.क्रं इमनपा/पापूवि/प्र.क्र./२१६५/२०२३दि.२८/०२/२०२३ रोजी यश इंजिनिअरिंग कन्सल्टंट प्रा.लि,नवि मुंबई प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून देणेत आलेला कार्यारंभ आदेश.

३) जा.क्र.इ.म.न.पा./पापुवि/प्र.क्र.८४२. दि.२१/०८/२०२३ रोजी इकडील कार्यालयामार्फ़त विषयांकीत कामी तांत्रिक मान्यता प्राप्त होणे करीता म.जी.प्रा. कोल्हापूर यांचेकडे पाठविणेत आलेला प्रस्ताव

४) जा.क्र.इ.म.न.पा./पापुवि/प्र.क्र.१४२२/१००१/२०२३ दि.०८/०९/२०२३ रोजी मा.प्रधानसचिव (नवि-२) नगरविकास विभाग यांचेकडे सादर केलेला प्रस्ताव.

५) अमृत २.० अंतर्गत सादर करणेत आलेल्या योजनांस अनुसरून दि.३१/१०/२०२३ रोजी उपसचिव, नगरविकास विभाग यांचे मार्फ़त घेणेत आलेली आढावा बैठक.

६) क्र.-याचीका- २०२३/प्र.क्र.०९/तां.क.३ दि.२३/११/२०२३ रोजीचे अवर सचिव,पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांचे पत्र.

प्रस्ताव :

मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली कोल्हापुर लोकसभा मतदार संघातील विविध प्रलंबित विषयांच्या अनुशंगाने दि.१७/०४/२०२३ रोजी बैठक पार पडली. सदर बैठकीमध्ये पंचगंगा नदी प्रदुषण कमी करण्याच्या अनुषंगाने इचलकरंजी महानगरपालिकेस २५ द.ल.लि क्षमतेचा मलशुध्दीकरण प्रकल्प उभारणेसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल अमृत योजने अंतर्गत तयार करणेचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिले आहेत. इचलकरंजी शहरामध्ये दैनंदिन निर्माण होणा-या घरगुती सांडपाण्यावरती प्रक्रिया करणे कामी आज अखेर खालील दोन टप्प्यांमध्ये शासनामार्फत योजना राबविण्यात आलेल्या आहेत-

**१) टप्पा क्रं. ०१ (Phase - I )**

सदरचा टप्पा हा सन १९९८ मध्ये कार्यान्वीत करणेत आला आहे. या योजनेमध्ये सन २००३ साला करीता २,५०,००० इतकी अंदाजीत लोकसंख्या गृहित धरून प्रस्ताव करणेत आला. सदर प्रस्तावामध्ये गावभागाकरीता जवळपास ८१ कि.मी. भुयारी गटर जाळे विकसित करणेत आले आहे व २० द.ल.ली क्षमतेचा मलशुध्दीकरण प्रकल्प कार्यान्वीत करणेत आला आहे.

**२) टप्पा क्रं. ०२ (Phase - II )**

UIDSSMT योजने अंतर्गत इचलकरंजी शहर वाढीव कबनुर व शहापूर भागाकरीता सन २०१४ साली याकामीचा प्रथम कार्यारंभ आदेश देणेत आलेला होता. सदर योजने अंतर्गत एकूण ९१ कि.मी. भुयारी गटर जाळे विकसित करणे व १८ द.ल.ली क्षमतेचा मलशुध्दीकरण प्रकल्प उभारणे प्रस्तावित आहे. सदर मक्तेदार यांनी एकूण ९१ कि.मी. भुयारी गटर जाळ्या पैकी ६१ कि.मी भुयारी गटर जाळे टाकले आहे. तदनंतर मक्तेदार यांनी सदरचे काम करणेस अकार्यक्षमता दाखवलेने मक्तेदार यांना देणेत आलेला मक्ता रद्द करून याकामी दि.०२/०६/२०२२ रोजी इकडील विभागामार्फत नव्याने मक्तेदार नियुक्त करणेत

आलेला आहे. सध्या या मक्तेदारमार्फत १८ द.ल.ली क्षमतेचा मलशुध्दीकरण प्रकल्प उभारणेचे काम सुरु आहे व उर्वरित ३० कि.मी भुयारी गटर जाळ्यामधील मुख्य गुरुत्ववाहीनी टाकणेचे काम सुरु आहे. सदरच्या कामाची अंतिम मुदत ही जुन २०२४ अखेर पर्यंत असुन सदरचे काम पुर्ण झाले नंतर शहरामध्ये दैनंदिन निर्माण होणा-या एकुण ३८ द.ल.लि घरगुती सांडपाण्यावरती प्रक्रिया करणेत येणार आहे. इचलकरंजी शहराचे वाढत जाणारी लोकसंख्या, शहरामध्ये कालानुरुप होणारी औद्योगिक प्रगती, शहरामध्ये वाढत्या तरंगत्या लोकसंख्येचे प्रमाण, अस्तित्वातील भुयारी गटर योजनेची कालापरत्वे कमी झालेली कार्यक्षमता, अस्तित्वातील भुयारी गटरांच्या जाळ्यामध्ये वारंवार होणारे लिकेजेस व चोकअप, इचलकरंजी शहराला भेडसवणारा पंचगंगा नदी प्रदुषण प्रश्न, सांडपाण्यावर प्रक्रिया करणेकामी शासना मार्फत वेळोवेळी सुधारित करणेत आलेली नियमावली या सर्व बाबींचा विचार करुन अस्तित्वातील भुयारी गटारीचे बळकटीकरण करणे, UIDSSMT अंतर्गत सुरु असलेल्या कामामध्ये नीधीच्या कमतरते मुळे काम होवु न शकणा-या पाईप लाईन टाकणे, शहराच्या वाढीव भागामध्ये भुयारी गटारीचे जाळे विकसित करणे इत्यादी गोष्टी करणे आवश्यक असलेने संदर्भ क्र.१ मधील बैठकीमध्ये विस्तृत चर्चेअंती पारीत केलेल्या आदेशानुसार इचलकरंजी शहराकरिता भुयारी गटर योजना (टप्पा ३-Phase- III ) सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी संदर्भ क्र.२ चे आदेशान्वये यश इंजिनिअरिंग कन्सल्टंट प्रा.लि. नवि मुंबई यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नियुक्ती करणेत आली आहे.

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी शहरातील अस्तित्वातील भुयारी गटर जाळे, UIDSSMT टाकणेत आलेले व प्रस्तावीत भुयारी गटारीचे जाळे, शहराची भौगोलिक परिस्थिती, शहरामध्ये दैनंदिन निर्माण होणा-या सांडपाण्याची गुणवत्ता, भविष्यात शहरामध्ये वाढणारी लोकसंख्या व विस्तार व त्या अनुशंगाने सांडपाणी व्यवस्थापना करिता करावयाच्या कार्यवाहीस अनुसरुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला आहे. सदर प्रस्तावातील ठळक बाबी खालील प्रमाणे -

| अ.क्र | तपशील | प्रस्तावीत |
|---|---|---|
| १ | लोकसंख्या | |
| | सन २०११ | २,८७,५०० |
| | सन २०२५ | ३,५२,९०३ + २०,०००(धावती लोकसंख्या) |
| | सन २०४० | ४,१७,१३२ + २५,०००(धावती लोकसंख्या) |
| | सन २०५५ | ४,७५,३१२ + ३०,०००(धावती लोकसंख्या) |
| २ | दैनंदिन दर डोई पाणी पुरवठा | १३५ लिटर |
| ३ | दैनंदिन निर्माण होणारे घरगुती सांडपाणी | |
| | सन २०२५ | ४३.४६ द.ल.लि |
| | सन २०४० | ५१.३२ द.ल.लि |
| | सन २०५५ | ५८.४३ द.ल.लि |
| ४ | सांडपाणी व्यवस्थापन करणेसाठी भोगोलिक दृष्ट्या शहराची झोन निहाय विभागणी | एकुण ३ झोन |
| ५ | प्रस्तावीत पंपींग स्टेशन | ०१ अस्तित्वातील + ०२ प्रस्तावीत = एकुण ०३ |
| ६ | झोन निहाय भुयारी गटारीचे जाळे | कमीत कमी २०० मी.मी ते जास्तीत जास्त ९०० मी.मी RCC पाईप |
| | झोन – १ | ६३.४०० कि.मी |
| | झोन – २ | १३५.९९० कि.मी |
| | झोन – ३ | १३९.५३७ कि.मी |
| | एकुण | ३३८.९६४ कि.मी |
| ७ | मल शुध्दीकरण केंद्र | |

| | | |
|---|---|---|
| | जुना चंदुर रोड नाल्याजवळ | क्षमता – १५ द.ल.लि |
| | बुध्द विहार टाकवडे वेस | क्षमता – १३ द.ल.लि |
| | बुध्द विहार टाकवडे वेस | क्षमता – १९.५ द.ल.लि |

सविस्तर प्रकल्प अहवाला मध्ये कंटूर सर्वेद्वारे शहराचा भौगोलिक उतार लक्षात घेऊन शहराची एकूण तीन झोन मध्ये विभागणी केली असून प्रत्येक झोन निहाय भुयारी गटाराचे जाळे प्रस्तावित केले आहे. तसेच वरील कोष्टकामध्ये नमूद अ.क्र.०७ नुसार एकुण ०३ मलशुद्धीकरण केंद्र प्रस्तावित केले आहेत. वरील सर्व बाबींकरिता रक्कम रु. ४९३.७४ कोटी इतक्या रक्कमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला आहे. सदर प्रस्तावास तांत्रिक मान्यता मिळणे कामी संदर्भ क्र. ०३ नुसार कार्यकारी अभियंता म.जी.प्रा. कोल्हापूर यांचेकडे सदरचा प्रस्ताव दाखल करणेत आलेला आहे.

पंचगंगा नदी प्रदुषण कमी करण्याच्या दृष्टीने इचलकरंजी महानगरपालिके मार्फत अमृत २.० च्या शासन संकेतस्थळावर रक्कम रु.२६०.७० कोटी इतक्या ढोबळ अंदाजपत्रकीय रक्कमेचा प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे संदर्भ क्र.०१ चे बैठकी मधील आदेशानंतर याकामी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असुन योग्य आवश्यक अंदाजपत्रकीय रक्कम ही र.रु.४९३.९४ कोटी इतकी आहे. सदर र.रु.४९३.९४ कोटी रक्कमेच्या सविस्तर प्रस्तावास अनुसरुन या कामी अमृत २.० योजनेच्या संकेत स्थळावर दाखल केला र.रु. २६०.७० रक्कमेचा प्रस्ताव रद्द होवून त्याऐवजी शहराच्या पुर्ण अभ्यासाअंती करणे आलेला र.रु.४९३.९४ कोटी रक्कमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल अंतिम ग्राह्य धरून त्याप्रमाणे शासन स्तरावर सुधारीत प्रकल्प अहवाल दाखल करणेस व राज्य स्तरीय तांत्रिक समितीची शिफ़ारस होवून केंद्र शासनकडे अंतिम वित्तीय व प्रशासकीय मान्यतेस सादर करणेस संदर्भ.क्र. ०४ नुसार मा. प्रधान सचिव (नवि-२), नगरविकास विभाग यांचेकडे प्रस्ताव दाखल करणेत आला.

दरम्यान अमृत २.० मध्ये सादर करणेत आलेल्या योजनांचा आढावा घेणेकरिता संदर्भ क्र.०५ नुसार उप सचिव, नगरविकास विभाग यांचेमार्फ़त VC द्वारे दि.३१/१०/२०२३ रोजी बैठक घेणेत आली. सदर बैठकीमध्ये इकडील कार्यालयामार्फ़त यापुर्वी अमृत २.० च्या संकेतस्थळावर दाखल करणेत आले नुसार भुयारी गटार संकलन व्यवस्था उभारणे, मलशुध्दीकरण केंद्र उभारणे कामी दाखल केले र.रु.२६०.७० कोटीचे प्रस्तावास अनुसरुन र.रु.२५५.७० कोटी इतका निधी अमृत २.० मधुन इचलकरंजी शहराकरीता उपलब्ध होणार असलेचे निश्चित झालेचे सांगुन इकडील कार्यालमार्फ़त प्रस्तावित केलेल्या र.रु.४९३.७४ कोटी रक्कमेच्या प्रस्तावापैकी र.रु.२५५.७७ कोटी इतकाच निधी अमृत २.० मध्ये उपलब्ध होणार असलेने उर्वरीत निधी करीता राज्य शासनाच्या निधी उपलब्ध असलेल्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत निधी मागणेकरिता प्रस्ताव दाखल करणेचे सुचविले आहे.

पंचगंगा नदी प्रदुषणावर प्रभावी उपाययोजना करणेकामी मा.उच्च न्यायालय.मुंबई यांनी पंचगंगा नदी प्रदुषणाचे अनुशंगाने दाखल झालेल्या जनहित याचिका क्र. १८३/२०१२ करिता दिलेल्या आदेशामध्ये इचलकरंजी महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करणेकामी महानगरपालिका प्रशासनास आदेशीत केले आहे. सदर आदेशास अनुसरुन महानगरपालिकेमार्फ़त पंचगंगा नदी प्रदुषण कमी करण्यात येणा-या उपाययोजनांची माहीती प्रत्येक तीन महिन्याच्या अंतराने त्रैमासिक अहवालामध्ये मा.विभागीय आयुक्त पुणे यांचे कडे सादर केली जाते. पंचगंगा नदी प्रदुषण विषयी नव्याने मा. हरितलवाद येथे अर्ज क्र. ५६३/२०२२-व्रिंदा बासु विरुध्द महाराष्ट्र शासन दाखल करणेत आला आहे. या अर्जास अनुसरुन महाराष्ट्र शासनामार्फ़त मा. मुख्य सचिव यांनी पंचगंगा नदी प्रदूषण कमी करणेकामी मुदतबंद कृती आराखडा मा.हरितलवाद यांचे कडे प्रतिज्ञापत्राद्वारे सादर करणेच्या अनुषंगाने. इचलकरंजी महानगरपालिकेमार्फ़त या कामीचे प्रतिज्ञापत्र दि.११/०७/२०२३ रोजी सादर करणेत आलेले आहे. या प्रतिज्ञापत्रामध्ये महानगरपालिकेमार्फ़त ०४ महिन्याच्या काळामध्ये सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून मा. शासनाकडे प्रस्तावास मान्यता घेवून, निधी उपलब्ध होणेकामी पाठवित असल्याचे नमुद केले आहे. तसेच संदर्भ क्र. ०६ नुसार उपरोक्त अर्जास अनुसरून मा. हरीत लवादाने दिलेल्या निर्देशास अनुसरून

मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दि.०९/११/२०२३ रोजी आयोजीत करणेत आलेल्या बैठकीमध्ये इचलकरंजी महानगरपालिके मार्फ़त अमृत-२.० अभियान अंतर्गत सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर चर्चा करणेत आलेली असून, संपुर्ण महानगरपालिकेने तयार केलेला सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये सर्व बाबींचा समावेश असल्याने सदरचा प्रस्ताव एकत्रितरित्या करणे योग्य होणार असल्याचे मत व्यक्त करून मा. हरीत लवाद यांचे आदेश मा. प्रधान सचिव यांचे निदर्शास आणून पुढील कार्यवाहि करणेचे निर्देश मा. मुख्य सचिव यांनी दिलेले आहेत.

**परंतु सदर कामी अमृत 2.0 मध्ये पुर्ण कामाकरीता निधी उपलब्ध होण्याची शक्यता नसल्याने तसेच वरील बाबी अवलोकनी घेवून इकडील कार्यालयामार्फ़त सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे आलेला प्रस्ताव हा महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत मंजूर होणेकरीता सादर होणे इष्ट असल्याचे इकडील मत आहे. सबब सदर योजना लवकरात लवकर मार्गी लागणे करीता व पंचगंगा नदी प्रदुषण मुक्त करणे करीता मा. हरीत लवाद यांचे निर्देश पाहता. सदर प्रकल्प अहवाल मा. शासनाकडे प्रशासकीय मान्यता मिळणेकरिता मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापुर, नवि मुंबई, यांचे मार्फ़त शासनाकडे मंजूरीकरीता शिफ़ारस होणे आवश्यक आहे.**

सदरचा प्रस्ताव सत्वर शासनाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी पाठवण्यापूर्वी या कामी तांत्रिक मान्यता घेणे तसेच या कामी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत केलेल्या आकृतीबंधानुसार महानगरपालिकेचा स्व हिस्सा प्रकल्प रक्कमेच्या ३०% प्रमाणे र.रु.१४८.१२२ कोटी इतक्या रक्कमेची तरतुद महानगरपालिकेस प्राप्त होणा-या १५ व्या वित्त आयोगाच्या अबंधनकारक निधी मधून अथवा महागरपालिकेच्या स्व निधीमधून तरतुद करणेस (मा. शासनाच्या प्रशासकीय मान्यतेस अधिन राहून स्व हिस्स्यामध्ये बदल होऊ शकतो). तांत्रिक मान्यता मिळणेकामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडे पाठविणे आवश्यक असून प्रकल्प रक्कमेच्या १% प्रमाणे रु.४,१३,९२,३८२/- इतकी फी भरणे आवश्यक असून त्यासही मंजुरी मिळणेबाबत प्रशासकीय ठराव होणेस्तव सादर. तसेच याकामी पुढिल आवश्यक कार्यवाही करणेचे अधिकार मा. आयुक्तसो यांना देणे बाबत मान्यता होणेस सादर.

**प्रशासकीय ठराव क्र. ५१ / २०२३**

**दि. ०८/१२/२०२३**

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येवुन महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत इचलकरंजी शहरातील अस्तित्वातील भुयारी गटार योजनेचे बळकटीकरण करणे. शहराच्या वाढीव भागामध्ये भुयारी गटाराचे जाळे तयार करणेच्या रक्कम रु. ४९३.७४ कोटीच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देणेत येत असुन सदरचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेकामी तसेच सदर योजने अंतर्गत शासन मान्य वित्तीय आकृतीबंधानुसार प्रकल्प रक्कमेच्या ३०% प्रमाणे महानगरपालिकेच्या स्व हिश्याची र.रु.१४८.१२२ कोटींची तरतुद महानगरपालिकेस प्राप्त होणा-या १५ व्या वित्त आयोगाच्या अबंधनकारक निधी मधून अथवा महागरपालिकेच्या स्व निधीमधून तरतुद करणेस तसेच प्रकल्प रक्कमेच्या १% प्रमाणे र.रु. ४,१३,९२,३८२/- इतकी फी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कोल्हापुर यांचेकडे तांत्रिक मान्यता घेणेकामी भरणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच या विकासकामाच्या अंमलबजावणीसाठी पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्तसो यांना प्रदान करण्यात येत आहेत.

०८/१२/२०२३

( ओमप्रकाश दिवटे )

**आयुक्त तथा प्रशासक**

**इचलकरंजी महानगरपालिका**

## इचलकरंजी महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव क्र.** ५२ **दि.**१८/१२/२०२३

---

प्रस्ताव : म.न.पा. प्रशासकीय ठराव क्र. १२/२०२३ दि. ०४/०५/२०२३ मध्ये सुधारणा करुन सुधारीत ठराव करणेबाबत.

**प्रस्ताव :**

इचलकरंजीमहानगरपालिकेचे सन २०२२/२०२३ चे सुधारीत व सन २०२३/२०२४ चे वार्षिक अंदाजपत्रकास प्रशासकीय ठराव क्र. ९७/२०२३ दि. १४/०३/२०२३ च्या ठरावान्वये सन २०२३-२०२४ मधील भाग दोन महसुली 'ज' राखीव निधी व संकिर्ण खर्च मधील महसुली व सर्व पुरवठादार आणि कंत्राटदार यांचे प्रलंबित बिले तरतुद रक्कम रु. २०,००,००,०००/- तरतुद करणेत आलेली आहे. सदर तरतुदी मधुन सन २०२२-२०२३ व त्यापुर्वीच्या आर्थिक वर्षामध्ये देणेत आलेल्या कार्याआदेशानुसार सुरु असलेली अथवा पुर्ण झालेल्या कामांची देयके खर्च टाकणेत यावीत तसेच सन २०२३-२०२४ या चालू आर्थिक वर्षात देणेत येणा-या कार्याआदेशानुसार केलेल्या कामांची सर्व देयके सन २०२३-२०२४ च्या मंजुर अंदाजपत्रकीय तरतुदी मधुन खर्च टाकणेकामी मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे दि. ०३/०५/२०२३ चे केले आदेशान्वये प्रशासकीय ठराव क्र. १२/२०२३ दि. ०४/०५/२०२३ नुसार खालीलप्रमाणे समिती गठित करणेत आली होती.

| अ.क्र. | समिती सदस्य |
|---|---|
| १ | अतिरीक्त आयुक्त; इचलकरंजी महानगरपालिका |
| २ | प्र. मुख्य लेखाधिकारी, इचलकरंजी महानगरपालिका |
| ३ | प्र. मुख्य लेखापरिक्षक , इचलकरंजी महानगरपालिका |

तथापि, सद्यस्थितीमध्ये केले गठित समिती मधील अतिरिक्त आयुक्त हे पद रिक्त असलेने मा. उपायुक्त यांनी सुधारणा करणेकामी सुचविले असुन सदर ठरावात सुधारणा करुन प्रशासकीय ठराव करुन मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.** ५२ **/२०२३** **दि.** १८ **/१२/२०२३**

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येवुन दि. १२/१२/२०२३ रोजी उपायुक्त यांनी दुरुस्ती सुचिवले प्रमाणे प्रशासकीय ठराव क्र. १२/२०२३ दि. ०४/०५/२०२३ अन्वये केले गठित समिती मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करणेत येवुन सदर समितीच्या मान्यतेने देयके अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | समिती सदस्य |
|---|---|
| १ | उपायुक्त, इचलकरंजी महानगरपालिका |
| २ | मुख्य लेखाधिकारी, इचलकरंजी महानगरपालिका |
| ३ | मुख्य लेखापरिक्षक , इचलकरंजी महानगरपालिका |

तसेच याकामीच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या फेर बदलासह पुढील सर्व कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्तसाो यांना प्रदान करण्यात येत आहेत.

18/12/2023

(ओमप्रकाश दिवटे)
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

## इचलकरंजी महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. ५३ दि.१८/१२/२०२३

---

प्रस्ताव : इचलकरंजी महानगरपालिका परिवहन ई - बसेस उपलब्ध करणेकरीता केंद्र शासनाच्या PM E Bus Sewa Scheme part - १ सहभाग घेणे व त्या अनुषंगाने सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) शासनास सादर करणेबाबत.

संदर्भ -

१. क्रमांक सकीर्ण २०२३/प्र.क्र. ४२८, नवि/ २३ दि. २८/०८/२०२३ अन्वये मा. प्रधान सचिव नवि - २ नगरविकास यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र पुरस्कृत पीएम ई बस सेवा योजनेच्या अनुषंगाने दि. २९/०८/२०२३ रोजीची बैठक

२. M/s ASRTU यांचे क्र. २२४४ दि. ३०/०८/२०२३ रोजीचे सर्व्हेबाबतचे ई मेल पत्र

३. दि. १३/०९/२०२३ चे मा. अवर सचिव यांचे पत्र

**प्रस्ताव :**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये केंद्र शासनाने संपुर्ण देशातील विविध शहरातील शहर वाहतुकीची सुविधा सक्षम करणेकरीता केंद्र शासनाच्या PM E Bus Sewa Scheme part - १ अंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार १०,००० ई - बसेस उपलब्ध करण्याचे धोरण आहे. त्या अनुषंगाने वरील संदर्भ क्र. ०१ अन्वये मा. प्रधान सचिव नवि - २ नगरविकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र पुरस्कृत पीएम ई बस सेवा योजनेच्या अनुषंगाने दि. २९/०८/२०२३ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीस मा. आयुक्त महोदय उपस्थित होते. सदर बैठकीच्या अनुषंगाने मे. एस.एस.आर.टी.यु. या वाहतुक क्षेत्रातील शिखर संस्थेकडुन उक्त संदर्भ क्र. ०२ अन्वये पत्र प्राप्त झाले असुन पीएम ई - बस सेवा योजनेबाबतची माहिती व मार्गदर्शक सुचना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर मार्गदर्शक सुचनेनुसार सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) सादर करणेबाबत संदर्भ क्र. ०१ नुसार झालेल्या बैठकीत निर्देश देण्यात आलेले आहेत.

तथापि संदर्भ क्र. ३ चे पत्रान्वये सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) सादर करणेची आवश्यकता नसुन फक्त संलग्नक (Annexure) सादर करणेस कळविले आहे. महानगरपालिकेच्या मालकीच्या V/३७ Veg Market & shopping Center V/३६ - Community Center & library, शहापुर गट नं. २३५ पै, २६० पै, २५७ पै, २५८ पै, सि.स.न. १८६८१ पै, १८६९२ पै. १८६९३ पै, १८६९४ पै. सोलगे मळा या जागेपैकी ३७ आर ही जागा डेपो चार्जिंग स्टेशन इ. सुविधा उभारणेकामी अनुज्ञेय असलेबाबत नगररचनाकार यांनी दि. ०७/०९/२०२३ चे पत्रान्वये अभिप्राय दिलेला आहे. त्या अनुषंगाने पीएम ई बस सेवा योजनेबाबतची माहिती व मार्गदर्शक सुचना यानुसार इचलकरंजी महानगरपालिका परिवहन उपक्रमामार्फत राज्य शासनास सादर करावयाचा प्रकल्प अहवाल संलग्नक (Annexure) तयार करण्यात आलेला असुन राज्य शासनास सादर करणेकरीता आपली मान्यता मिळावी.

**प्रशासकीय ठराव क्र. ५३ /२०२३** दि. १८ /१२/२०२३

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येवुन केंद्र शासनाने संपुर्ण देशातील विविध शहरातील, शहर वाहतुकीची सुविधा सक्षम करणेकरीता केंद्र शासनाच्या PM E Bus Sewa Scheme part - १ अंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार उपरोक्त संदर्भान्वये इचलकरंजी महानगरपालिका परिवहन उपक्रमा करीता नगररचनाकार यांनी दि. ०७/०९/२०२३ ने अनुज्ञेय असले अभिप्रायानुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या V/३७ Veg Market & shopping Center V/३६ - Community Center & library, शहापुर गट नं. २३५ पै, २६० पै, २५७ पै, २५८ पै, सि.स. न. १८६८१ पै, १८६९२ पै. १८६९३ पै, १८६९४ पै. सोलगे मळा या जागेपैकी ३७ आर या जागेवर डेपो, चार्जिंग स्टेशन इ. सुविधा उभारणी करणेस, ई बसेस उपलब्ध करणेकरीता बांधकाम विभागाकडील र.रु. ४,९९,७५,४६०/- व विद्युत विभागाकडील पॉवर सप्लाय करीता र.रु. ४,३४,९४,००९/- चे अंदाजपत्रक असे एकुण र.रु. ९,३४,७०,४६९/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास व संदर्भ क्र. ३ अन्वये सदरच्या प्रकल्पाचा संलग्नक (Annexure) मा. शासनाकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच या विकास कामाच्या अंमलबजावणीसाठी पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्तसो यांना प्रदान करण्यात येत आहेत.

(ओमप्रकाश दिवटे) १८/१२/२०२३
आयुक्त तथा प्रशासक
इचलकरंजी महानगरपालिका

# इचलकरंजी महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव क्र. ५४** **दि. २१/१२/२०२३**

प्रस्ताव : वैशिष्ठपुर्ण योजनेतुन उभारणेत येत असलेले ९९ शुध्द पेयजल प्रकल्प मागणी बाबत.

प्रस्ताव :

इचलकरंजी शहरामध्ये वैशिष्टपुर्ण योजनेतुन शहरामध्ये ९९ आर.ओ + यु.व्ही/ यु.एफ + यु. व्ही या तंत्रज्ञानावर आधारीत शुध्द पेयजल प्रकल्पाची उभारणी करणे कामी मे. जे आर.डी. सेल सर्व्हिसेस, सत्यम इंजिनिअर्स, ब्रिमा इंजिनिअरींग व संगिता सेल्स या मक्तेदारांना कार्यादेश दिले असुन ९९ पैकी ८८ ठिकाणी शेड चे बांधकाम पुर्ण झाले आहे. ११ ठिकाणी शेड चे बांधकाम अद्याप पुर्ण झाले नाही. त्यापैकी खालील ८ ठिकाणी वाद सुरु आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | शेरा |
|---|---|---|
| १ | गणपती मंदिर गणेश नगर | जागेचा वाद |
| २ | दत्तनगर अभिनंदन पतसंस्थेजवळ | जागेचा वाद |
| ३ | दत्त मंदिर जवाहरनगर | जागेचा वाद |
| ४ | वेताळ पेठ पोतदार हॉस्पिटल | जागेचा वाद |
| ५ | रेणुकानगर झोपडपट्टी | जागेचा वाद |
| ६ | वेताळ पेठ महालक्ष्मी मंदिर | जागेचा वाद |
| ७ | जगदाळे घर विठ्ठल नगर | जागेचा वाद |
| ८ | बापुजी साळुंखे हायस्कूलजवळ | जागेचा वाद |

सदर ठिकाणी जागेचे वाद सुरु आहे. व नागरीकांचा विरोध आहे. सध्या पाणी पुरवठा विभागाकडे नविन ६ ठिकाणी शुध्द पेयजल प्रकल्पाची मागणी होत आहे. त्यापैकी ठिकाणी खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | ठिकाण | शेरा |
|---|---|---|
| १ | पंचगंगा नदी श्री. वरदविनायक मंदिर शेजारी | मंदिराचा बोअरवेल व जागा उपलब्ध आहे. |
| २ | श्री. स्वामी समर्थ गुरुपाठी दिंडोरी प्रणीत नदीवेस इचलकरंजी | मंदिराचा बोअरवेल व जागा उपलब्ध आहे. व मंदिरास कायमस्वरुपी पाण्याकरीता सेवकरी यांना पिण्याच्या पाण्याच्या सोईकरीता मर्यादित पाणीवितरण पेक्षा अधिकचा पाणी उपलब्ध करुन देणेकामी सादर |
| ३ | सावली सोसायटी गृहनिर्माण संस्था ओपन स्पेस | म.न.पा. मालकीचा बोअरवेल विज पुरवठा व जागा उपलब्ध |
| ४ | स्फुर्ती युवक मंडळ शेजारी ओपन स्पेस अटल बिहारी वाजपेयी चौक | म.न.पा. मालकीचा बोअरवेल विज पुरवठा व जागा उपलब्ध |
| ५ | श्री. शंकरराव पुजारी जलतरण तलाव | मोठे तळे सुशोभिकरण कामी सदर ठिकाणचे शुध्द पेयजल प्रकल्प इतरत्र स्थलांतरीत करणेकामी प्रभाग क्र. 17 मध्ये श्री. शंकरराव पुजारी जलतरण तलाव आवारात वीज व बोअर वेलचे पाणी उपलब्ध आहे. |
| ६ | साने गुरुजी विदयामंदिर वेताळ पेठ | शाळेस पाणी देणेच्या अटीवर प्रकल्पकरीता रस्ता लगत शाळा व म.न.पा. ची जागा उपलब्ध करुन देणेच्या अटीवर जागा उपलब्ध होईल |
| ७ | भोनेमाळ डॉ. शर्मा हॉस्पिटल जवळ इ. इस्टेट जागा | सदर ठिकाणी इ. इस्टेट जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. |

अ.क्र. १ ते ४ व ६ व ७ मध्ये नव्याने मागणी आली आहे. व अ.क्र. ५ मध्ये तयार प्रकल्प सुशोभिकरण कामी स्थलांतरीत करणेचे आहे. सदर ठिकाणी प्रकल्पाकरीता आवश्यक पाणी व वीज उपलब्ध आहे. सदर ठिकाणी प्रकल्प उभारणी कामी मान्यता मिळणेस इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ५४ / २०२३** **दि. २१/१२/२०२३**

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येवुन इचलकरंजी शहरामध्ये मंजुर केले ९९ ठिकाणांपैकी प्रस्तावात नमुद अ.क्र. १ ते ८ या ठिकाणी जागेचा वाद असले कारणाने तसेच सदर निधी

फेब्रुवारी २०२४ अखेर खर्च पडणे आवश्यक असलेने खालीलप्रमाणे नव्याने मागणी असले अ.क्र. १ ते ४ व ६ व ७ या ठिकाणी शुध्द पेयजल प्रकल्प उभारणी करणेस मान्यता देणेत येत असून अ.क्र. ५ मधील करणेत आलेला प्रकल्प सुशोभिकरणाच्या कारणास्तव स्थलांतरीत करणेस मंजुरी देणेत येत आहे.

| अ.क्र. | ठिकाण | शेरा |
|---|---|---|
| १ | पंचगंगा नदी श्री. वरदविनायक मंदिर शेजारी | मंदिराचा बोअरवेल व जागा उपलब्ध आहे. |
| २ | श्री. स्वामी समर्थ गुरुपीठ दिंडोरी प्रणीत नदीवेस इचलकरंजी | मंदिराचा बोअरवेल व जागा उपलब्ध आहे. व मंदिरास कायमस्वरुपी पाण्याकरीता सेवकरी यांना पिण्याच्या पाण्याच्या सोईकरीता मर्यादित पाणीवितरण पेक्षा अधिकचा पाणी उपलब्ध करुन देणेकामी सदर |
| ३ | सावली सोसायटी गृहनिर्माण संस्था ओपन स्पेस | म.न.पा. मालकीचा बोअरवेल विज पुरवठा व जागा उपलब्ध |
| ४ | स्फूर्ती युवक मंडळ शेजारी ओपन स्पेस अटल बिहारी वाजपेयी चौक | म.न.पा. मालकीचा बोअरवेल विज पुरवठा व जागा उपलब्ध |
| ५ | श्री. शंकरराव पुजारी जलतरण तलाव | मोठे तळे सुशोभिकरण कामी सदर ठिकाणचे शुध्द पेयजल प्रकल्प इतरत्र स्थलांतरीत करणेकामी प्रभाग क्र. 17 मध्ये श्री. शंकरराव पुजारी जलतरण तलाव आवारात वीज व बोअर वेलचे पाणी उपलब्ध आहे. |
| ६ | साने गुरुजी विद्यामंदिर वेताळ पेठ | शाळेस पाणी देणेच्या अटीवर प्रकल्पकरीता रस्ता लगत शाळा व म.न.पा. ची जागा उपलब्ध करुन देणेच्या अटीवर जागा उपलब्ध होईल |
| ७ | भोनेमाळ डॉ. शर्मा हॉस्पिटल जवळ इ. इस्टेट जागा | सदर ठिकाणी इ. इस्टेट जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. |

21/12/2023

( ओमप्रकाश दिवटे )

**आयुक्त तथा प्रशासक**

**इचलकरंजी महानगरपालिका**

**इचलकरंजी महानगरपालिका**

**प्रशासकीय ठराव क्र.५५** दि. २२/१२/२०२३

प्रस्ताव : स्वच्छ भारत मिशन २.० अंतर्गत माहिती शिक्षण, संवाद व प्रसार या घटकाव्दारे इचलकरंजी महानगरपालिकेला शासनाकडुन प्राप्त निधीतुन जनजागृती अभियान राबविणेबाबत त्रयस्थ संस्था नेमणे कामी निविदा प्रसिध्द करणे.

संदर्भ –

१. शासन निर्णय क्र. स्वमअ-२०२२/प्र.क्र.७३/नवि ३४

२. महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांचे दि. ३१/०१/२०२३ चे पत्र

प्रस्ताव :

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार स्वच्छ भारत मिशन २.० अंतर्गत इचलकरंजी महानगरपालिका कचरामुक्त करण्याच्या उद्दीष्टाने मोठया प्रमाणात इचलकरंजी शहरातील नागरीकांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे. याकामी माहिती शिक्षण, संवाद व प्रसार या घटकांतर्गत केंद्र व राज्य शासनाकडुन र.रु. ५३,४७,०००/- इतका निधी संदर्भ क्र. २ ने प्राप्त झाला आहे. सदर निधी तत्काळ खर्च करावा अशा राज्य शासनाच्या सुचना वारंवार प्राप्त होत आहेत. तरी इचलकरंजी शहरातील नागरीकांचे कचरामुक्त शहर तसेच स्वच्छता विषयाचे योग्यरित्या प्रबोधन, जनजागृती होणेकामी त्रयस्थ यंत्रणा अथवा संस्था नेमणे योग्य आवश्यक आहे. सदर माहिती शिक्षण, संवाद व प्रसार या अंतर्गत येणारे उपक्रमामधील घटक NOC DSR घटक असल्यामुळे कामाची व्याप्ती निश्चित करुन त्यांचे दरपत्रक संबंधित क्षेत्रात काम करणा-या संस्थाकडुन दरपत्रक (Quotations) मागवुन त्याअधारे अंदाजपत्रक तयार करुन त्याची तांत्रिक मान्यता घेऊन निविदा प्रसिध्दीचे कामकाज करणे आवश्यक आहे.

सदर माहिती शिक्षण संवाद व प्रसार (IEC) या घटकांतर्गत होणा-य कामाची व्याप्ती खालीलप्रमाणे आहे.

| S | Description | Scope of work |
|---|---|---|
| १ | IEC Activites | • Door to Door<br>• Street play<br>• Daily events<br>• Events in School, NGOs<br>• Awareness camp in every municipal, private schools and collages should be taken once in three monts<br>• Conducting ward wise awareness competions (ladies and Children) and felicitate with gifts and certificates. This acticity should be done once in every ३ months for all (ladies and children)<br>• Conducting awareness competitions e.g. Essay writing, Elocution, Drawing etc. for students and felicitate with gifts and certificates. This activity should be done once in every ३ months<br>• Conducting special awareness campaigns for slum area |
| २ | Social media | • Handling social media<br>• Fb\| Insta, Twitter, Swactha App etc.<br>• SBM feedbach of citizen<br>• Making og animation/ short film for display in city and taking feedbacks form citizens |
| १ | MIS | • MIS Techincal support<br>• City profile preparation and management<br>• Monthly progress Data strategy and management |

| | | |
|---|---|---|
| | | • MIS data managmaent as per SS, GFC, ODF++/Water+/MV ४.० protocol, C.M capable city beautification competition SBM related fund |
| | | • Strategy and supervison for maximum performance |
| २ | Swacchata App | • Logbook formats and preparation as per MIS and filed |
| ३ | Progressive document | • citizen Engagement format templates<br>• Document as per toolkit<br>• Preparation of proper route map for door to door collection of waste |
| ४ | Document Action | • Document preparation and management<br>• SS२०२४/२५<br>• ODF ++/Water +<br>• GFC ३ Star / ५ Star<br>• Safai Sraksha Challenge<br>• Innovation<br>• Mazi Vasundhara abhiyan SBM related component<br>• Power of presentation<br>• AI certified cource person to be provided |
| ५ | Other Suport | • Filed Advisory (technical)<br>• Solid waste management<br>• Processing harit brand, recycling etc<br>• Waste Water management<br>• Fecal sludge management<br>• Innovation<br>• ICT<br>• vendors and procurement data base<br>• Social media support<br>• GIS |
| ६ | Miscellaneous | • As per ULB requirement under the scope of work |

उपरोक्त प्रमाणे अंदाजपत्रक तयार करुन त्याची तांत्रिक मान्यता घेवुन निविदा प्रसिध्दतीचे कामकाज करणे यासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ५५ / २०२३** **दि. २२ /१२/२०२३**

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येवुन संदर्भ क्र. २ अन्वये केंद्र व राज्य शासनाकडुन र.रु. ५३,४७,०००/- इतक्या प्राप्त झाले निधीतुन स्वच्छ भारत मिशन २.० अंतर्गत इचलकरंजी महानगरपालिकेस माहिती, शिक्षण, संवाद व प्रसार या घटकाव्दारे जनजागृती अभियान राबविणेकामी प्रस्तावात नमुद केले घटकातंर्गत अंदाजपत्रक तयार करणेस व केले अंदाजपत्रकानुसार निविदा मागविणेस मंजुरी देणेत येत असुन याकामी प्राप्त झाले निधीतुन काम करुन घेणेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच या विकासकामाच्या अंमलबजावणीसाठी पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्तसो यांना प्रदान करण्यात येत आहेत.

22/12/2023

( ओमप्रकाश दिवटे )

**आयुक्त तथा प्रशासक**
**इचलकरंजी महानगरपालिका**

# इचलकरंजी महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव क्र. ५६**

दि.०५/०१/२०२४

प्रस्ताव : इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रातील नाविन्यपुर्ण कामास निधी उपलब्धते करीता प्रस्ताव सादर करणेबाबत.

प्रस्ताव :

इचलकरंजी शहरास ऐतिहासिक परंपरा असुन शहरातील तत्कालीन नगरपरिषदेची स्थापना सन १९९३ मध्ये करणेत आली होती. या नगरपरिषदेस १३० वर्षाची परंपरा आहे. लोकसंख्या वाढीचा दर विचारात घेता सध्या ती अंदाजे ३.५० लाखापेक्षा जास्त असुन शहर वस्त्रो उदयोगाचे केंद्र असल्याने व्यवसायाच्या निमित्ताने आसपासचे ग्रामिण भागातुन शहरात ये जा करणारी लोकसंख्या ८० हजाराचे असापास आहे. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाच्या दि. २९ जुन २०२२ च्या अधिसुचनेनुसार राज्यात २८ वी महानगरपालिका म्हणुन इचलकरंजी नगरपरिषदेचे महानगरपालिकेमध्ये रुपांतर करुन इचलकरंजी महानगरपालिका अस्तित्वात आली. महानगरपालिकेच्या स्थापनेनंतर नवनिर्मीत महानगरपालिकेची रचना व कार्यपध्दती निश्चितीचे कामकाज तसेच मुलभुत सोयीसुविधा पुरविणे हे कामकाज तात्काळ सुरु करण्यात आलेले आहे.

शहर पंचगंगा लगत वसले असुन शहराचे क्षेत्र फळ २९.८४ चौरस किलोमिटर इतके आहे. इचलकरंजी शहर १६.४१ उत्तर अक्षांश आणि ७४.२७ पुर्व रेखांशावर स्थित आहे. शहराची समुद्र सपाटीपासुनची उंची ५३९ मी. (१७६८ फुट) इतकी आहे. इचलकरंजी शहराचा विस्तार विचारात घेता प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने व नागरीकांना त्यांच्या दैनंदिन सेवा तात्काळ व सुलभतेने देता याव्यात यासाठी शहराचे चार झोन करुन प्रत्येक झोन मध्ये विभागीय कार्यालये स्थापित करण्यात आली आहेत.

दि. १ जुलै २०१७ नंतर स्थापन झालेली इचलकरंजी ही पहिलीच महानगरपालिका असुन २९ जुन २०२२ पर्यत इचलकरंजी नगरपरिषद असल्यामुळे नगरपरिषदेस सहाय्यक अनुदान प्राप्त होते. हे सहाय्यक अनुदान महानगरपालिकेच्या स्थापनेनंतर पाच वर्षानी बंद होणार आहे. सदयस्थितीत महानगरपालिकेकडे प्राप्त होणारे सहाय्यक अनुदान कर्मचा-यांचे पगार करणेकामी खर्ची पडत असुन महानगरपालिकेसाठी नागरीकांना मुलभुत सोयीसुविधा पुरविणे करीता शासनाकडुन अनुदान प्राप्त होणे गरजेचे आहे .

इचलकरंजी शहराची स्थापना, वाढती लोकसंख्येची घनता, नगरपरिषद असताना जकातीवरुन प्राप्त होणा-या करावर विकसीत करण्यात आलेली उदयाने, जलतरण तलाव, नाटयगृह, एतिहासिक वारसा स्थळे यांची देखभाल दुरुस्ती, नुतनीकरण, सुशोभीकरण अंमलबजावणीवर पडणा-या मर्यादा यामुळे महानगरपालिकेची उत्पन्नाची स्त्रोते मर्यादीत आहे. आवश्यकतेप्रमाणे कर आकारणी होत नसल्याने महापालिकेची आर्थिक परिस्थिती पुरेशी योग्य नाही. तथापि इचलकरंजी शहराचा दर्जा उंचावणेकरीता शहरातील नागरीकांना चांगले राहणीमान, चांगला दर्जा, मिळणेकरीता शहरात विविध मुलभुत विकास सोइ सुविधा कामांची अत्यंत आवश्यकता आहे. सबब जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत शहरातील विकास कामांकरीता नाविन्यपुर्ण योजनांतर्गत निधी मागणीकरीता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | योजनेचे नाव | विकास कामाचा तपशिल | अंदाजित खर्च |
|---|---|---|---|
| १ | नाविन्यपुर्ण योजना | इचलकरंजी महानगरपालिकेच्या भगतसिंग गार्डन, चिल्ड्रन पार्क येथे मत्सालय व तारांगण उभारणे | रु.रु. ७.४५ कोटी |
| | | एकुण | रु.रु. ७.४५ कोटी |

तरी उपरोक्त इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रातील नाविन्यपुर्ण योजना अंतर्गत भगतसिंग गार्डन, चिल्ड्रन पार्क येथे मत्सालय व तारांगण उभारणे कामसाठी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात निधी मागणी करीता सदरचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापुर यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

p.t.o.

दि. ०५/०१/२०२४

**प्रशासकीय ठराव क्र. ५६ / २०२४**

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येवुन जिल्हा वार्षिक योजनातंर्गत शहरातील विकास कामांकरीता नाविन्यपुर्ण योजनेतंर्गत इचलकरंजी शहराचा दर्जा उंचावणेकरीता शहरातील नागरीकांना चांगले राहणीमान, चांगला दर्जा, मिळणेकरीता शहरात विविध मुलभुत विकास सोई सुविधा करणेकरीता, इचलकरंजी महानगरपालिकेच्या भगतसिंग गार्डन, चिल्ड्रन पार्क येथे मत्सालय व तारांगण उभारणेकामी अंदाजीत रक्कम रु. ७.४५ कोटी इतका निधी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात मागणी करणेस सदरचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी कोल्हापूर, यांचेकडे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच या विकासकामाच्या अंमलबजावणीसाठी पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्तसो यांना प्रदान करण्यात येत आहेत.

०५/०१/२०२४

( ओमप्रकाश दिवटे )

**आयुक्त तथा प्रशासक**
**इचलकरंजी महानगरपालिका**